Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# मानवी जीवनासाठी पर्यावरणाचे संरक्षण

**प्रा. परशराम भगिरथ वाघेरे,**
**शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक.**

**प्रास्ताविक :**

आजच्या 21 व्या शतकात म्हणजेच धकाधक्कीच्या जीवनात मानवाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यात महत्त्वाचे म्हणजे प्रदूषण या प्रदूषणाचा प्रश्न ज्वलंत आहे. यात हवा, जल, मृदा व ध्वनी प्रदूषण या सर्वच प्रदूषणांचा परिणाम हा पर्यावरणावर मानवी जीवनावर होत असतो.

आज जन्माला येणारे नवे अपत्य हे पहिला श्वास हा प्रदूषणाचाच घेतो. यास मानवच जबाबदार आहे. मानवानेच जंगलतोड, नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास म्हणजेच डोंगर, नद्या नाले व सखोल भागांचे सपाटीकरण यामुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. याचा परिणाम ग्रामीण व शहरी भागात मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. या परिणामामुळे आजही अनेकजण विविध आजारांनी त्रस्त झालेले दिसून येत आहे. जर आपण सर्वांनी पर्यावरणाचे संरक्षण केले तरच आपण आपले व सजीवांचे संरक्षण करु, म्हणूनच पर्यावरण संरक्षण करणे ही काळाची गरज होवून बसली आहे.

'वंसुधरा'चे विद्रोह करणाऱ्या या अविचारी मानवाला जागे करण्याकरिता सगळ्या विश्वाने 22 एप्रिल हा 'वंसुधरा दिन' म्हणून पाळवयास सुरुवात केली आहे. पर्यावरणाचा प्रश्न हा संबंध पृथ्वीचाच असल्याने आंतराष्ट्रीय ग्राहक संघटनेकडून 1992 सालापासून "वसूंधरा दिन" पाळाला आहे. त्यासाठी 1986 साली पर्यावरणाचा कायदा करुन माणसाच्या स्वच्छ व आरोग्यपूर्ण पर्यावरणाचा हक्क मान्य केला गेला आहे. "प्रदूषणावर मात, पर्यावरणाला साथ" अशा घोषवाक्यांचा प्रचार करण्याची वेळ आज आपल्यावर आली आहे.

**पर्यावरण म्हणजे काय ?**

पर्यावरण म्हणजे मानवाच्या सभोवतालची भौगोलिक परिस्थिती यामध्ये हवा, पाणी, जमीन, वृक्ष व आकाश इ. घटकांचा समुच्च्य होय. मानव हा पर्यावरणाशिवाय जगू शकत नाही, कारण मानवाच्या सर्व गरजा म्हणजे अन्न, वस्त्र व निवारा ह्या पर्यावरणावरच अवलंबून असतात व त्या पर्यावरणातून पूर्ण होत असतात. मानवाला पर्यावरणाची व पर्यावरणाला मानवाची साथ मिळणे आवश्यक आहे. मानवाच्या जीवनामध्ये पर्यावरणाला अनन्य साधारण महत्त्व आहे. मानवच नाही तर सर्व सजीव प्राण्यांचे अस्तित्व हे पर्यावरणावरच अवलंबून आहे.

**मानवी जीवन व पर्यावरण संबंध :-**

पूर्वीच्या काळी ऋषी मुनीं शिष्याला शिक्षण हे जंगलात देत असत, पर्यावरणाच्या सानिध्यात देत असत. त्यातूनच विद्यार्थ्याला पर्यावरणाचे महत्त्व समजत होते. आज आपल्याला पावलोपावली पर्यावरणाची गरज भासत आहे.

पर्यावरणाशिवाय आपण जगू शकत नाही कारण मानवाच्या जीवाची घडी पर्यावरणावर बसलेली आहे. पर्यावरण हे आपल्याला आई प्रमाणेच तिच्या कुशीत घेऊन एक प्रकारचे मानवाचे पालन पोषण करते.

आजकाल मानवाची प्रगती जी झाली आहे ती पर्यावरणाची साथ घेऊनच झालेली आहे. मानवाने पृथ्वीतलावरती मोठे मोठे शोध लावले आहे. त्याने आकाश पाताळ एक केले आहे. शोध लावण्याच्या मागे तो पर्यावरणावर होणारे परिणाम विसरुनच चालला आहे. याचे कारण मानवाच्या जीवनाला उध्वस्त करणारे काही भागही माणूस पर्यावरणात सोडून मुक्त होतो. आजकाल बरेच राष्ट्र अणु चाचणी घेऊन जो तो आपली कुवत जगाला दाखविण्याचा प्रयत्न करत आहे. परंतु त्याचे पर्यावरणावर होणारे परिणामही लक्षात घ्यायला हवेत. मानव सतत स्वत:चाच विचार करतो, त्याने पर्यावरणाचा कधीच विचार केला नाही. त्यामुळे पर्यावरणाचा समतोल होऊन पर्जन्य हे वेळेवर पडत नाही. त्याचे दुष्काळा सारखे परिणाम मानवालाच भोगावे लागतात. मानवाने आपल्या सभोवतालच्या जीवसृष्टीचा व पर्यावरणाचा ऱ्हास केला आहे. मानव आपल्या अनावश्यक गोष्टी पर्यावरणात टाकतो. नदी, नाले यामध्ये कारखान्यांचे रसायनयुक्त दूषित पाणी सोडतो, प्लॅस्टीक कचरा फेकतो. यामुळे प्रदूषण वाढते म्हणून मानवाने पर्यावरण संरक्षणासाठी वृक्षांची लागवड मोठ्या प्रमाणात केली पाहिजे.

**मानवी जीवन व पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व :**

मानवाने नेहमी पर्यावरण संरक्षणाचा ध्यास घ्यायला हवा. "पर्यावरण शिक्षण हेच जीवन" हा संकल्प आपण आपल्या अंगी किंवा गळी उतरायला हवा. आपण 5 जून हा "पर्यावरण दिन" म्हणून साजरा करतो. वर्षातून एक दिवस हा पर्यावरण दिन साजरा करण्यापेक्षा दररोजच मानवाने आपल्या कृतीतून साजरा केला तर त्यास कोणतीच उणीव भासणार नाही. परंतु जसजशी लोकसंख्या वाढली की, तसा मानव आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी पर्यावरणाचा नास करीत असतो. तो आपल्या गरजा पर्यावरणावरच भागवित असतो. याकरिता मानवाने वृक्षतोड थांबविली पाहिजे. यासाठी शासनाने जनतेसाठी कार्यशाळा यांचे आयोजन करावे, जनतेचे प्रबोधन करावे, पर्यावरणावर तज्ज्ञ व्यक्तींच्या व्याख्यानांचे आयोजन करुन चित्रफितीद्वारे पर्यावरण जनजागृती करावी. जंगल तोडीवर कडक निर्बंध आणावे. तरच खऱ्या अर्थाने पर्यावरण संरक्षण होऊन पर्यावरणाचा समतोल राखला जाईल.

मानवी जीवन हे निसर्ग व पर्यावरण यांच्यावर अवलंबून आहे हे मानवाने सतत ध्यानात घ्यायला हवे. संत गाडगेबाबांनी लोकांना स्वत:च्या कृतीतून गाव स्वच्छ ठेवण्याचा आदर्श घालून दिला. त्यांचे विचार एकदा लोकांपर्यंत पोहचविण्याची गरज पुन्हा निर्माण झाली आहे. पर्यावरणाचे संरक्षण ही केवळ मानवाची जबाबदारीच नव्हे तर ते मानवाचे आद्य कर्तव्य आहे. "पर्यावरण नष्ट तर मानवाचे अस्तित्व नष्ट" हे लक्षात घेऊन पर्यावरणातील घटकांचा योग्य तो विनियोग झाला पाहिजे.

पृथ्वीवर आपण मोठ मोठे शोध घेत आहोत, भूगर्भातील खनिज तेल, कोळसा व विविध धातूंच्या खाणी शोधत आहे. यामुळे अधिक प्रदूषणही होत आहे. यावरही शासनाने निर्बंध घातले पाहिजे. राज्यात "हरितक्रांती" घडवून आणली

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

पाहिजे. पर्यावरणाची जबाबदारी स्वीकारुन आज आपण हरितक्रांती घडून आणायला हवी. नोबेल पारितोषिक विजेत्या केनियाच्या वगाई मथाई यांनी 1 कोटी झाडे लावली त्यांचा आदर्श आपण घ्यायला हवा. आपल्याकडे सुध्दा अशा प्रमाणात झाडांची लागवड केली पाहिजे. म्हणतात ना !

।। वृक्षवल्ली आम्हा सोयीरे वनचरे ।।
पक्षीही सुस्वरे आळवीती ।।

संत तुकाराम महाराजांनी वृक्षांच महत्त्व सांगून मानवी जीवनात वृक्ष हेच आपले सखे सोयरे आहेत हे मानवाला त्यांनी पटवून दिले आहे. मानवाने शहरी भागात तर सिमेंटची जंगले तयार केली आहे. सुट्टीच्या दिवसात तर तो जंगल शोधत भटकंती करीत असतो. कारण मानवी मन हे निसर्गातच रमत आहे. मानव सगळं दु:ख विसरुन तो वेगवेगळ्या विश्वात वावरत रममाण होत असतो. निसर्गात गेल्यावर बालकवींच्या ओठावर बोल येतात. ।।हिरवे हिरवे गार गालीचे, हरित तृणाच्या मखमखमलीचे।। त्या सुंदर मखमखमलीवर ती, फुलराणी ही खेळते ।। या सारख्या कविता तयार केल्या.

मानवाने जंगलाचे / पर्यावरणाचे संवर्धन केले पाहिजे. नैसर्गिक स्त्रोतांचे संवर्धन म्हणजे त्यांचे रक्षण व त्यांच्या दर्जात, वैविध्यात व पुरवठ्यात घडवून आणलेली सुधारणा. मृदा, जल, हवा, उर्जा व वने हा आपला अमूल्य नैसर्गिक ठेवाच आहे. आगामी पिढ्यांसाठी तो राखून ठेवला पाहिजे. अफाट नैसर्गिक संपदेचे "विश्वस्त" म्हणून मानवाने कार्यरत राहून या नैसर्गिक संपत्तीची काळजी घेतली पाहिजे. आपल्या पूर्वजांनी हा ठेवा आपल्याकडे सोपविला आहे. त्याचा नाश करण्याच्या अथवा तो खराब करण्याचा कोणताही अधिकार आपल्याला नाही, हे जेव्हा मानवाला कळेल तेव्हाच खऱ्या अर्थाने पर्यावरणाचे संरक्षण तो करु शकेल.

।।पृथ्वीच माझी माय होय। मीच तिचा रक्षणकर्ता हाय।। मानवी जीवनासाठी पर्यावरण संरक्षणाची लढाई जिकांयची असेल तर त्याची सुरुवात स्वत: पासून, आपल्या घरापासून झाली तरच पर्यावरणाचे संरक्षण व मानवी जीवन यांची सांगड घातली जाईल. यात शंकाच नाही.

**संदर्भ :-**

1. जोहारापूरकर चौधरी,(1999) **पर्यावरण जाणीव जागृती,** सुमेय प्रकाशन, डोंबीवली पूर्व.
2. भांडारकर के.म., **पर्यावरण शिक्षण,** नूतन प्रकाशन, पुणे -30.
3. **पर्यावरण विशेषांक,** वार्षिक नियतकालिका 2005-2006, शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक.